भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१३-१४/४९**

**डीएनबीएस.(पीडी)सीसी.क्र.३४७/०३.१०.३८/२०१३-१४** १ जुलै, **२०१३**

**सर्व एनबीएफसी (आरएनबीसी सोडून)**

महोदय,

**महापरिपत्रक - अबँकीय वित्तीय कंपनी - मायक्रो वित्त संस्था (एनबीएफसी एमएफआय) ह्या, एनबीएफसींच्या नवीन वर्गाची सुरुवात निदेश**

आपणास माहितच आहे की, ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच ठिकाणी मिळाव्यात ह्यासाठी, भारतीय रिझर्व बँक अद्यावत केलेल्या परिपत्रके/अधिसूचना देत असते. ह्या परिपत्रकामधील, जून ३०, २०१३ पर्यंत अद्यावत केलेल्या सूचना खाली दिल्या आहेत. ही अद्यावत केलेली अधिसूचना, आरबीआयच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आली आहे.

आपला ,

(एन एस विश्वनाथन)
प्रधान मुख्य महाव्यवस्थापक

अनुक्रमणिका


| परिच्छेद क्र. | तपशील |
|---|---|
| १ | प्रस्तावना |
| २ | प्रारंभिक |
| | १. लघु शीर्षक व ह्या निदेशांची सुरुवात |
| | २. ह्या निदेशांची व्याप्ती |
| | ३. एनबीएफसी एमएफआयची व्याख्या |
| | ४. एनबीएफसी एमएफआयचा विनियामक साचा |
| | ५. विद्यमान एनबी एफसींचे वर्गीकरण |
| | ६. वैधानिक लेखापरीक्षकाचे प्रमाणपत्र |
| | ७. अनुपालनांवर देखरेख |
| | ८. एनबीएफसी-एमएफआय म्हणून पंजीकरण करण्यासाठी अर्ज |
| | ९. भौगोलिक विविधीकरण |
| | १०. एसआरओ तयार करणे |
| | ११. अनुपालनांवर देखरेख |
| | १२. एनबीएफसी-एमएफआय म्हणून पंजीकरण करण्यासाठी अर्ज |
| | परिशिष्ट |

(१) <u>प्रस्तावना</u>

नाणेविषयक धोरणाच्या दुस-या तिमाहीमध्ये, नोव्हेंबर २०१० मध्ये सांगितल्याप्रमाणे, एमएफआय क्षेत्रामधील प्रश्न व काळज्या ह्यांचा अभ्यास करण्यासाठी, रिझर्व बँकेच्या केंद्रीय मंडळाची एक उप-समिती (अध्यक्ष - श्री. वाय. एच. मालेगाम) स्थापन करण्यात आली. ह्या समितीने तिचा अहवाल जानेवारी २०११ मध्ये सादर केला. २०११-१२ च्या नाणेविषयक धोरणाच्या निवेदनात घोषित केले होते की, ह्या समितीने शिफारस केलेल्या विनियमांचा सर्वसाधारण रचनात्मक साचा ह्या बँकेने स्वीकारला आहे.

**(२) एनबीएफसीच्या एका वेगळ्या वर्गाची (एमएफआय) निर्मिती**

एनबीएफसींच्या एका निराळ्याच वर्गाची (अबँकीय वित्तीय कंपनी - मायक्रो वित्त संस्था (एनबीएफसी एमएफआय) निर्मिती करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार एनबीएफसींचे पुढीलप्रमाणे वर्ग असतील :

(१) ॲसेट फायनान्स कंपनी (एएफसी)
(२) गुंतवणुक कंपनी (आय सी)
(३) कर्ज कंपनी (एल सी)
(४) इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपनी (आय एफ सी)
(५) कोअर इनवेस्टमेंट कंपनी (सी आय सी)
(६) इन्फ्रास्ट्रक्चर डेट फंड - अबँकीय वित्तीय कंपनी (आय डी एफ एनबीएफसी)
(७) अबँकीय वित्तीय कंपनी - मायक्रो वित्त संस्था (एनबीएफसी एम एफ आय)

(३) ह्या उप-समितीने, एनबीएफसी एमएफआयद्वारा विनियमांचे पालन करण्यावर देखरेख ठेवण्याबाबत, औद्योगिक संघांसाठीही एका भूमिकेची शिफारस केली आहे. ह्याबाबतची वेगळी मार्गदर्शक तत्वे नंतर देण्यात येतील.

(४) काटेकोरपणे पालन करण्यासाठी पुढील अधिसूचना देण्यात आल्या होत्या. एनबीएफसी एमएफआयचा विनियामक साचा असलेली अधिसूचना क्र. डीएनबीएस.पीडी.क्र.२३४.सीजीएम (युएस) २०११ दि. डिसेंबर ०२, २०११, अबँकीय वित्तीय कंपन्या (ठेवी न घेणा-या व धारण न करणा-या) प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश २००७ ला सुधारित करणारी अधिसूचना डीएनबीएस.पीडी.क्र.२३५/सीजीएम (युएस) २०११ दि. डिसेंबर २, २०११ आणि, अबँकीय वित्तीय कंपन्या ऑडिटर्स रिपोर्ट (रिझर्व बँक) निदेश २००८.

<u>(२) प्रारंभिक</u>

**१. लघु शीर्षक व ह्या निदेशांची सुरुवात**

(१) हे निदेश अबँकीय वित्तीय कंपन्या - मायक्रो वित्त संस्था ((रिझर्व बँक) निदेश, २०११ म्हणून ओळखले जातील.
(२) हे निदेश डिसेंबर २, २०११ पासून जारी होतील.

## २. ह्या निदेशांची व्याप्ती

ह्या निदेशात व्याख्या केलेल्या प्रत्येक अबँकीय वित्तीय संस्था - मायक्रो वित्त संस्थेला (एनबीएफसी एमएफआय) लागु होतील.

## ३. एनबीएफसी एमएफआयची व्याख्या

एनबीएफसी एमएफआयची व्याख्या म्हणजे, पुढील अटी पूर्ण करणारी, ठेवी न स्वीकारणारी एनबीएफसी (भारतीय कंपन्या अधिनियम १९५६ च्या कलम २५ खाली परवाना मिळालेली कंपनी सोडून) :

(१) किमान निज निधी रु.५ कोटी असलेली (देशाच्या ईशान्य प्रदेशात पंजीकृत झालेल्या एनबीएफसी एमएफआयसाठी रु.२ कोटी).
(२) नक्त ॲसेट्सच्या ८५% पेक्षा कमी नसलेले ॲसेट्स क्वालिफायिंग ॲसेट्स च्या स्वरुपाचे असावेत.

[१] केवळ जानेवारी १, २०१२ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेले ॲसेट्स ह्यांनाच क्वालिफायिंग ॲसेट्स च्या निकषांचे पालन करावे लागेल. एक विशेष बाब म्हणून, जानेवारी १, २०१२ रोजी असलेल्या विद्यमान ॲसेट्सना, क्वालिफायिंग ॲसेट्सचे तसेच एकूण नक्त ॲसेट्सचे निकष पूर्ण करण्याबाबत विचारात घेतले जाईल. हे ॲसेट्स परिपक्वतेपर्यंत सुरु राहतील व त्यांचे नूतनीकरण करता येणार नाही.
वरील (२) संबंधाने,

“नक्त (नेट) ॲसेट्स” म्हणजे, रोख रक्कम, बँकेतील शिल्लक आणि मनी मार्केट संलेख सोडून असलेले एकूण ॲसेट्स.

क्वालिफायिंग ॲसेट्स म्हणजे, पुढील निकष पूर्ण करणारे कर्ज :

(अ) घरगुती वार्षिक उत्पन्न रु.६०,००० पेक्षा अधिक नसलेल्या ग्रामीण कर्जदाराला किंवा घरगुती वार्षिक उत्पन्न रु.१,२०,००० पेक्षा अधिक नसलेल्या नागरी किंवा अर्ध नागरी कर्जदाराला, एनबीएफसी एमएफआयने दिलेले कर्ज.

(ब) प्रथम चक्रातील कर्ज रक्कम रु.३५,००० पेक्षा अधिक नसल्यास व त्यानंतरच्या चक्रात रु.५०,००० पेक्षा अधिक नसल्यास.

(क) कर्जदाराचे एकूण कर्ज रु.५०,००० पेक्षा अधिक नसल्यास.

(ड) रु.१५,००० पेक्षा अधिक कर्ज रकमेची (दंडाशिवाय परत फेडीसह) मुदत २४ महिन्यांपेक्षा अधिक नसल्यास.

(ई) कोणत्याही तारणाशिवाय कर्ज दिले जावे.

(फ)[२] रद्द केले आहे.

[३] उत्पन्न निर्माण करण्यासाठी दिलेल्या कर्जांची एकूण रक्कम ही, त्या एमएफआयने दिलेल्या एकूण कर्जांच्या किमान ७०% असावी, त्यामुळे, उरलेली ३०% रक्कम, घर-दुरुस्ती, शिक्षण, वैद्यकीय व इतर आकस्मिक कारणांसाठी देता येऊ शकेल.

---

[१] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित

[२] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये रद्द

[३] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित

(ग) कर्जदाराच्या पसंतीनुसार कर्जाची परतफेड साप्ताहिक, पाक्षिक किंवा मासिक हप्त्यांनी केली जाऊ शकते.

(३) ह्याशिवाय, उरलेल्या १५% मधून एनबीएफसी एमएफआयला मिळत असलेले उत्पन्न, त्याबाबत विहित केलेल्या विनियमांनुसार असेल. (४) एनबीएफसी एमएफआय म्हणून ठरु न शकणारी एनबीएफसी, तिच्या एकूण ॲसेट्सच्या १०% पेक्षा अधिक अशी कर्जे, मायक्रो वित्त क्षेत्राला देणार नाही.

**४. एनबीएफसी एमएफआयचा विनियामक साचा**

(अ) [४] एंट्री पॉईंट नॉर्म्स

**(१) विद्यमान असलेल्या एनबीएफसी.**

(अ) एनबीएफसी एमएफआय म्हणून रुपांतरित होऊ इच्छिणा-या सर्व पंजीकृत एनबीएफसींनी ताबडतोब व कोणत्याही परिस्थितीत ऑक्टोबर ३१, २०१२ पर्यंत त्याबाबत पंजीकरण केलेच पाहिजे - मात्र, त्यांनी त्यांचा निज निधी (एन ओ एफ) मार्च ३१, २०१३ पर्यंत रु. ३ कोटी एवढा आणि मार्च ३१, २०१४ पर्यंत तो रु. ५ कोटी एवढा ठेवला पाहिजे. तसे न झाल्यास, त्यांनी खात्री करुन ध्यावी की, त्यांनी मायक्रो वित्त क्षेत्राला (उदा. व्यक्ती, एसएचजी किंवा जेएलजी जे एमएफआयकडून कर्ज मिळविण्यास पात्र आहेत) दिलेली कर्जे, त्यांच्या एकूण ॲसेट्सच्या १०% पर्यंतच सीमित आहेत. (ब) ईशान्येकडील क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या एनबीएफसींना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांनी ठेवावयाचा किमान एनओएफ हा, मार्च ३१, २०१२ पर्यंत रु. १ कोटी व मार्च ३१, २०१४ पर्यंत रु. २ कोटी एवढा असेल.

**(२) नवीन कंपन्या**

एनबीएफसी एमएफआय म्हणून पंजीकृत होऊ इच्छिणा-या सर्व नवीन कंपन्यांनी किमान रु. ५ कोटी एवढा किमान एनओएफ ठेवणे आवश्यक आहे. (मात्र देशाच्या ईशान्य प्रदेशात, पुढील सूचना दिल्या जाईपर्यंत, तो रु. २ कोटी एवढा असेल) आणि ह्याशिवाय त्यांनी, सुरुवातीपासूनच, पुढील परिच्छेदांमध्ये दिलेल्या इतर सर्व निकषांचे पालन केले पाहिजे.

(ब) प्रुडेंशियल नॉर्म्स

(अ) कॅपिटल ॲडेक्वसी

सर्व नवीन एनबीएफसी एमएफआय, टायर-१ व टायर-२ भांडवलांचा, त्यांच्या एकूण जोखीम भारित ॲसेट्सच्या १५% पर्यंतचा, कॅपिटल ॲडेक्वसी रेशो ठेवतील. कोणत्याही वेळी, एकूण टायर-२ भांडवल हे टायर-१ भांडवलाच्या १००% पेक्षा अधिक असणार नाही. ताळेबंदावरील ॲसेट्ससाठीचे जोखीम-भार आणि ताळेबंदाबाहेरील बाबींसाठीचा क्रेडिट कनवर्शन फॅक्टर हा, अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणा-या व धारण न करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या परिच्छेद १६ मध्ये दिल्यानुसारच असेल.

टीपा (१) एनबीएफसी एमएफआय म्हणून वर्गीकृत करावयाच्या विद्यमान एनबीएफसींमध्ये, रु. १०० कोटींपेक्षा कमी ॲसेट-आकारमान असलेल्या संस्थांना, एप्रिल १, २०१२ पासून ह्या नॉर्म्सचे पालन करणे आवश्यक आहे. ॲसेटचे आकारमान रु. १०० कोटी किंवा त्यापेक्षा अधिक असलेल्या संस्थांना, आधीच किमान सीआरएआर १५% ठेवणे आवश्यक आहे.

---

[४] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित

(२) २५% पेक्षा अधिक लोन पोर्टफोलियो असलेल्या, आंध्र प्रदेशातील एनबीएफसी  एमएफआयसाठीचा सीआरएआर, केवळ वर्ष २०११-२०१२ साठी १२% असेल. त्यानंतर मात्र त्यांना १५% एवढा सीआरएआर ठेवावा लागेल.

[५] सीआरएआर काढण्यासाठी एपी पोर्टफोलियोसाठी केलेली तरतुद ही एनओएफचा एक भागच समजली जाईल आणि पाच वर्षांच्या कालावधीमध्ये, एपी पोर्टफोलियोसाठीच्या तरतुदींबाबतच्या रेकगनिशनमधील घट ही, पाच वर्षांच्या काळात समानतेने धरण्यात येईल.  त्यानुसार, मार्च ३१, २०१३ रोजी, एपी पोर्टफोलियोसाठी केलेल्या तरतुदीच्या १०० टक्के हे, त्या दिवशीचा सीआरएआर काढण्यासाठी, एमओएफमध्ये काल्पनिक (नोशनली) परत मिळविले जातील आणि ही परत मिळविण्यात आलेली रक्कम, प्रत्येक वर्षी (म्हणजे मार्च २०१७ पर्यंत) २० टक्क्याने कमी करत नेली जाईल.  ह्याचे एक उदाहरण जोडपत्र ३ मध्ये दिले आहे.  कोणत्याही प्रकारचे राईट-बॅक किंवा टप्प्या-टप्प्याने तरतुदीकरण करण्यास परवानगी नाही.

[६] नॉन-एपी पोर्टफोलियो आणि नोशनल एपी पोर्टफोलियो(ताळेबंदाच्या तारखेस असलेली येणे रक्कम वजा, ह्या पोर्टफोलियो वरील नोशनल परत मिळविलेली अशी तरतुद) ह्या वरील कॅपिटल ॲडेक्वसी ही, जोखीम भारित ॲसेट्सच्या १५ टक्के एवढी ठेवली जाणे आवश्यक आहे.

(ब) ॲसेट-वर्गीकरण व तरतुदीकरणाचे नॉर्म्स :

एप्रिल १, २०१२ पासून, सर्व एनबीएफसी  एमएफआय पुढील नॉर्म्सचे अनुसरण करतील (तोपर्यंत, त्या कंपन्या, अबॅंकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणा-या व धारण न करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बॅंक) निदेश, २००७ मध्ये दिलेल्या ॲसेट वर्गीकरण व तरतुदीकरणाच्या नॉर्म्सचे अनुसरण करतील.
ॲसेट वर्गीकरणाचे नॉर्म्स

(१) स्टॅंडर्ड ॲसेट म्हणजे, मुद्दलाची परतफेड करण्यात किंवा व्याज प्रदान करण्यात कोणतीही कसुरी होणार नाही व ज्यात कोणतीही अडचण येणार नाही आणि व्यवसायामधील नेहमीच्या जोखमीपेक्षा ज्यात अधिक जोखीम येणार नाही असा ॲसेट.

(२) अकार्यकारी ॲसेट म्हणजे, ज्यामध्ये, ९० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक काळापर्यंत व्याज/मुद्दल ह्यांची परतफेड झालेली नाही असा ॲसेट.

तरतुदीकरणाचे नॉर्म्स  :

[७] आंध्र प्रदेशातील एमएफआयना आलेल्या अडचणींचा विचार करता, त्यातील कित्येकांना, त्या राज्यामधील अकार्यकारी ॲसेट्स संबंधाने लक्षणीय अशा रकमेची तरतुद करावी लागली.  एखाद्या एनबीएफसी  एमएफआयच्या आर्थिक स्थितीचे खरे चित्र ताळेबंदात दिसून येण्यासाठी, एपी पोर्टफोलियोसाठी केलेले तरतुदीकरण हे विद्यमान तरतुदीकरणाच्या नॉर्म्सनुसार (म्हणजे ठेवी न घेणा-या व धारण न करणा-या कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बॅंक) निदेश, २००७) केले गेले पाहिजे.  नॉन-अेपी पोर्टफोलियोसाठीचे तरतुदीकरण, डिसेंबर ०२, २०११ च्या अधिसूचनेनुसार, एप्रिल १, २०१३ पासून खाली दिल्यानुसार केले जावे.

एनबीएफसी   एमएफआयद्वारे ठेवली जाणारी एकूण कर्ज-तरतुद, कोणत्याही वेळी, - (अ) आऊटस्टॅंडिंग लोन पोर्टफोलियोच्या १% किंवा, (ब) ९० दिवसांपेक्षा अधिक परंतु १८० दिवसांपेक्षा कमी कालासाठी थकित झालेल्या एकूण

---

[५] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित

[६] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित

[७] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित

कर्ज हप्त्याच्या ५०% आणि १८० दिवस किंवा अधिक कालासाठी थकित झालेल्या एकूण कर्ज हप्त्याचे १००% - ह्या दोन पैकी जे जास्त असेल, त्यापेक्षा कमी नसावी.

(क) अन्यथा निर्देश केला नसल्यास, अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणा-या किंवा धारण न करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ मधील इतर सर्व तरतुदी, एनबीएफसी  एमएफआयना लागु होतील.

**(क) इतर विनियम**

**(अ) कर्जाची किंमत/खर्च**

(१) सर्व एनबीएफसी  एमएफआय, १२% पेक्षा अधिक नसलेली, एकूण मार्जिन कॅप ठेवतील.  आऊटस्टँडिंग असलेल्या कर्जाच्या शिल्लक रकमांच्या पाक्षिक सरासरीवर व्याजाचा खर्च/किंमत काढली जाईल आणि क्वालिफायिंग ॲसेट्सच्या आऊटस्टँडिंग लोन पोर्ट फोलियोच्या सरासरी पाक्षिक शिल्लकेवर व्याज-उत्पन्न काढले जाईल.

[८] एनबीएफसी कितीही मोठी असली तरीही सर्व एनबीएफसींसाठी, मार्जिन कॅप, मार्च ३१, २०१४ पर्यंत १२% एवढी असेल.  तथापि १ एप्रिल २०१४ पासून, मालेगाम समितीने व्याख्या केल्यानुसार, मोठ्या एमएफआयसाठी (रु. १०० कोटींपेक्षा अधिक असलेले लोन पोर्टफोलियो) १०% व इतर एमएफआयसाठी १२% ह्यापेक्षा अधिक असू नये.

(२) [९] (काढून टाकण्यात आले.)

[१०] एनबीएफसी  एमएफआयने खात्री करुन घ्यावी की, एखाद्या वित्तीय वर्षामधील कर्जांवरील सरासरी व्याजदर हा, त्या वित्तीय वर्षामधील सरासरी कर्ज खर्च अधिक विहित मर्यादेच्या आतील मार्जिन ह्यापेक्षा अधिक नाही.  ह्याशिवाय, वैय्यक्तिक कर्जांवरील व्याजदर २६% पेक्षा अधिक जाऊ शकत असला तरीही, वैय्यक्तिक कर्जांवरील कमाल व किमान व्याजदरातील फरक ४ टक्क्यांपेक्षा अधिक ठेवण्यास परवानगी नाही.  एमएफआयने घेतलेल्या कर्जावर दिलेले व्याज व त्यांनी आकारलेले व्याज हे अनुक्रमे, आऊटस्टँडिंग कर्जाच्या व लोन पोर्ट फोलियोच्या मासिक शिल्लकांवर काढले जावे. हे आकडे वैधानिक ऑडिटर्सकडून दरसाल प्रमाणित केले जावेत आणि ताळेबंदातही प्रदर्शित केले जावेत.

(३) प्रक्रिया आकार हे एकूण कर्ज रकमेच्या १% पेक्षा अधिक नसावेत.  हे प्रक्रिया आकार मार्जिन कॅप किंवा इंटरेस्ट कॅपमध्ये समाविष्ट केले जाऊ नयेत.

(४) एनबीएफसी  एमएफआयनी, कर्जदार व त्याची/तिची पती/पत्नी ह्यांच्यासाठीचा, केवळ गट, जनावरे, जीवन स्वास्थ्य ह्यासाठीच्या विम्याचा प्रत्यक्ष खर्च वसुल करावा.  प्रशासकीय खर्च वसुल केला असल्यास तो आयआरडीएच्या मार्गदर्शक तत्वांनुसार असावा.

---

[८] डीएनबीएस (पीडी).सीसी.क्र.१२७/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. मे ३१, २०१३ अन्वये स्थापित.
[९] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये रद्द
[१०] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित

**(ब) कर्ज देतानाचे उचित आचार**

**(१) दरांमधील पारदर्शकता**

(अ) कर्जाची किंमत/खर्च काढण्याबाबत फक्त तीन घटक असावेत - म्हणजे - व्याजाचा आकार, प्रक्रिया आकार आणि विम्याचा हप्ता (ह्यामध्ये त्याबाबतचा प्रशासकीय खर्चही समाविष्ट आहे).

(ब) विलंबाने केलेल्या प्रदानासाठी कोणताही दंड लावण्यात येणार नाही.

(क) एनबीएफसी एमएफआय कर्जदाराकडून कोणतीही सुरक्षा ठेव/मार्जिन घेणार नाही.

(ड) कर्ज करारासाठी एक प्रमाणभूत नमुना असावा.

(ई) प्रत्येक एनबीएफसी एमएफआयने कर्जदाराला एक लोन कार्ड द्यावे व त्यात पुढील गोष्टींचा निर्देश असावा

(१) आकारलेल्या व्याजाचा परिणामकारक दर

(२) ह्या कर्जाशी संलग्न असलेल्या इतर सर्व अटी व शर्ती

(३) कर्जदाराची योग्य ओळख पटविणारी माहिती

(४) मिळालेले हप्ते आणि अंतिम हप्ता ह्यासह सर्व परतफेडीबाबत एनबीएफसी एमएफआयने दिलेल्या पोचपावत्या

(५) लोन कार्डमधील सर्व नोंदी एतद्देशीय भाषेत असाव्यात.

(फ) एनबीएफसी एमएफआयने आकारलेला परिणामकारक व्याजदर तिच्या सर्व कार्यालयांमध्ये आणि तिने दिलेल्या सर्व साहित्यात आणि तिच्या वेबसाईटवरही ठळकपणे प्रदर्शित केला जावा.

**(२) बहुविध कर्ज देणे, अति कर्ज घेणे व छुपे कर्जदार**

(अ) जॉईंट लायाबिलिटी ग्रुप (जेएलजी)/स्वयंसहाय्य गट (एसएचजी) ह्यांचे सभासद नसलेल्या वैय्यक्तिक कर्जदारांना किंवा जेएलजी/एसएचजीचे सभासद असलेल्या कर्जदारांनाही एनबीएफसी एफएसआय कर्ज देऊ शकते.

(ब) एक कर्जदार एकापेक्षा अधिक एसएचजी/जेएलजीचा सभासद होऊ शकत नाही.

(क) एकाच कर्जदाराला दोनापेक्षा अधिक एनबीएफसी एमएफआयनी कर्ज देऊ नये.

(ड) कर्ज देणे व परतफेडीच्या पहिल्या हप्त्याची ठरविलेली तारीख ह्यादरम्यान एक किमान विलंबावधि ठेवला जावा. असा विलंबावधी, परतफेडीच्या वारंवारतेपेक्षा कमी नसावा. उदा. - साप्ताहिक परतपेडीबाबत, हा विलंबकाल एक आठवड्यापेक्षा कमी नसावा.

(ई) विनियमांचे उल्लंघन करुन दिलेल्या कर्जाची वसुली, पूर्वीची सर्व विद्यमान कर्जे संपूर्णपणे फेडली जाईपर्यंत स्थगित करावी.

(फ) सर्व कर्जांची मंजुरी व वाटप केवळ एकाच केंद्रीय स्थानी केले जावे आणि ह्यात एकापेक्षा अधिक व्यक्तींचा सहभाग असावा. ह्याशिवाय, वाटप करतेवेळी, जवळून देखरेख केली जावी.

**(२) अ [११] अटींच्या अनुपालनाची खात्री करणे**

क्रेडिट इन्फर्मेशन कंपन्यांचे सभासदत्व घेतल्यास, ह्यापैकी ब-याच अटींचे अनुपालन करण्यास साह्यभूत ठरेल. त्यानुसार, येथे पुनश्च सांगण्यात येत आहे की, प्रत्येक एनबीएफसी एमएफआयने, सीआयसी रेग्युलेशन अधिनियम, २००५ खाली स्थापन झालेल्या किमान एका तरी क्रेडिट इन्फर्मेशन कंपनीचे (सीआयसी) सभासद होऊन,

[११] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित

ह्या सीआयसींना वेळेवर व अचूक माहिती द्यावी आणि एसएचजी/जेएलजी ह्यांच्या सभासदत्वासंबंधीच्या अटींचे पालन, कर्ज बाजारी असण्याचा स्तर व कर्ज घेण्याचे स्त्रोत इत्यादि बाबतची त्यांच्याजवळील माहितीचा उपयोग करावा. सीआयसींजवळील माहितीची व्याप्ती व गुणवत्ता सशक्त होण्यासाठी काही वेळ लागू शकतो. तरीही, एनबीएफसी एमएफआय संस्था, कर्जदारांनी दिलेली स्वयं-घोषणापत्रे व त्यांच्या स्थानिक चौकशीवर व वार्षिक घरगुती उत्पन्नावर ह्याबाबतीत अवलंबून राहू शकतात.

**(३) वसुलीच्या बिगर-जबरदस्तीच्या रीती**

- एनबीएफसी एमएफआयनी खात्री करुन घ्यावी की त्यांनी त्यांच्या फील्ड स्टाफची भरती, प्रशिक्षण व पर्यवेक्षणासाठी आचार संहिता व प्रणाली तयार केलेल्या आहेत.
- ह्या आचार संहितेमध्ये वेळोवेळी सुधारित परिपत्रक सीसी.क्र.८० दि. सप्टेंबर २८, २००६ अन्वये, एनबीएफसींसाठी दिलेल्या आचार संहितेवरील मार्गदर्शक तत्वांचाही समावेश असावा.
- सर्वसाधारणतः केवळ एकाच केंद्रीय ठिकाणावरुन वसुली केली जावी. दोन किंवा त्यानंतरच्या अधिक वेळा कर्जदार ह्या केंद्रीय ठिकाणी हजर न झाल्यासच, कर्जदाराच्या घरी किंवा कामाच्या जागी वसुलीसाठी जाण्याची परवानगी फील्ड स्टाफला दिली जावी.
- वेळोवेळी सुधारित केलेले परिपत्रक सीसी.क्र. ८० दि. सप्टेंबर २८, २००६ अन्वये, एनबीएफसींसाठीच्या आचार संहितेमधील इतर सर्व बाबींचे पालने केले जावे.

**(क) कॉर्पोरेट गव्हर्नन्स**

सीसी.क्र.१८७ दि. जुलै १, २०११ अन्वये एनबीएफसींना कॉर्पोरेट गव्हर्नन्सवर दिलेले महापरिपत्रक एनबीएफसी एमएफआयनाही लागु असेल.

(ड) **कार्यक्षमतेमधील सुधारणा**

एनबीएफसी एमएफआयनी, त्यांच्या बॅक-ऑफिसमधील कार्यकृतींचा आढाव घेऊन, अधिक चांगले नियंत्रण मिळविण्यासाठी, कार्यरीती सुलभ करण्यासाठी आणि खर्च कमी करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान व प्रणालींमध्ये आवश्यक त्या गुंतवणुकी कराव्यात.

**(ई) इतर**

सर्व एनबीएफसींनी प्राधान्य क्षेत्रावरील मार्गदर्शक तत्वांबाबत, आरबीआयच्या ग्रामीण योजना व ऋण विभागाने, बँक लोन्स टु मायक्रो फायनान्स इंन्स्टिट्युशन्स (एमएफआय) प्रायोरिटी सेक्टर स्टेटस ह्या शीर्षकाखाली बँकांना दिलेल्या, परिपत्रक आरपीसीडी.सीओ.प्लान.बीसी.६६/०४.०९.०१/२०१०-११, दि. मे ३, २०११ चा संदर्भ घ्यावा.

**(५)** वरील अटी पूर्ण करणा-या विद्यमान एनबीएफसींनी, त्यांचे एनबीएफसी एमएफआय असे वर्गीकरण बदलून घेण्यासाठी, ह्या बँकेने दिलेले मूळ पंजीकरण प्रमाणपत्रा (सीओआर) सह, त्यांचे पंजीकृत कार्यालय ज्याच्या अधिकार क्षेत्राखाली येते त्या प्रादेशिक कार्यालयाकडे जावे. ह्या विनंतीबरोबर, मार्च ३१, २०११ रोजी असलेल्या ॲसेट (कर्ज) साचा दर्शविणारे वैधानिक ऑडिटरचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. एनबीएफसी एमएफआय म्हणून वर्गीकरण केले जाण्यासाठी, पात्र असलेल्या ॲसेट्सचाच समावेश करण्याची जबाबदारी संबंधित कंपनीचीच असेल. वर्गीकरणामधील असा बदल, ह्या बँकेने, एनबीएफसी एमएफआय म्हणून दिलेल्या पंजीकरण प्रमाणपत्रात समाविष्ट केला जाईल.

(६) अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणा-या किंवा धारण न करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या परिच्छेद १५ अनुसार, सर्व एनबीएफसींनी, दर वर्षी ३१ मार्च रोजी समाप्त होणा-या आर्थिक वर्षाच्या अखेरीस असलेल्या त्या कंपनीच्या स्थितिसंबंधाने वैधानिक ऑडिटर्सनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. एनबीएफसी एमएफआयसाठी, अशा प्रमाणपत्रात, त्या कंपनीने एक एनबीएफसी एमएफआय म्हणून वर्गीकृत होण्यासाठी, ह्या परिपत्रकात घातलेल्या अटी पूर्ण केल्या असल्याचेही निर्देशित केले असावे.

(७) ह्या निदेशांचे पालन न केले गेल्यास, आरबीआय अधिनियम, १९३४ खाली दंडात्मक तरतुदी लागु होतील.

(८) एनबीएफसी एमएफआयच्या व्यवसायाच्या विशिष्ट स्वरुपाचा विचार करता, सर्व एनबीएफसींना लागु असलेल्या, सर्वसाधारण उचित आचार संहिते (एफपीसी) व्यतिरिक्त, त्यांना, डीएनबीएस.सीसी.पीडी.क्र.२८६/०३.१०.०४२/२०१२-१३ दि. जुलै २, २०१२ अन्वये दिलेली, उचित आचार संहितेच्या मूलतत्वांचे पालन करणे, एमएफआयसाठी आवश्यक आहे. [१२] एनबीएफसी.एमएफआयनी खात्री करुन घ्यावी की, एसएचजी/जेएलजी तयार करण्यामध्ये त्यांच्याकडून अधिक मोठे स्त्रोत उपलब्ध केले जात आहेत आणि असे गट तयार झाल्यानंतर, त्यांची क्षमता व अधिकार वाढविण्यासाठी सुयोग्य प्रशिक्षण व कैाशल्यवर्धक कार्यकृतीही केल्या जात आहेत.

### (९) [१३] भैागोलिक फेरबदल

विशिष्ट अशा भैागोलिक क्षेत्रांमध्ये अवांच्छित घनता टाळण्यासाठी एनबीएफसी एमएफआयनी, अंतर्गत जोखीम मर्यादा निश्चित करण्यासाठी त्यांच्या संचालक मंडळाचा सल्ला घ्यावा.

### (१०) [१४] एसआरओ स्थापन करणे

मालेगाम समितीने, विनियामक बाबींच्या अनुपालनावर देखरेख ठेवण्यासाठी औद्योगिक संघांवर अधिकतर जबाबदारी टाकण्याची शिफारस केली आहे. सर्व एनबीएफसी एमएफआयना, किमान एकातरी स्वयं विनियामक संस्थेचे (एस आर ओ) सभासद होणे आवश्यक असून (ह्या संस्थेला रिझर्व बँकेची मान्यता) ह्या एसआरओने विहित केलेल्या आचार संहितेचे पालन करणे त्यांना आवश्यक आहे. एसआरओच्या रचनेवरील मार्गदर्शक तत्वे लवकरच देण्यात येतील.

### (११) [१५] अनुपालनावरील देखरेख

एमएफआयसाठी विहित केलेल्या सर्व विनियमांच्या अनुपालनाची जबाबदारी मूलतः त्या एनबीएफसी एमएफआयवरच आहे. औद्योगिक संघ/एसआरओ देखील ह्या विनियामक साचाचे अनुपालन होत असल्याची खात्री करण्यामध्ये महत्वाची भूमिका करतील. ह्याशिवाय, एनबीएफसी एमएफआयना कर्ज देणा-या बँकांही खात्री करुन घेतील की, एनबीएफसी एमएफआयमधील, प्रणाली, कार्यरीती व कर्ज देण्याची धोरणे ही विनियामक साचाला धरुनच आहेत.

---

[१२] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित
[१३] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित
[१४] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित
[१५] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित

**(१२) [१६] एनबीएफसी  एमएफआय म्हणून पंजीकरण करण्यासाठीचा अर्ज**

एनबीएफसी  एमएफआय म्हणून पंजीकृत होऊ इच्छिणा-या सर्व विद्यमान एनबीएफसींनी, ह्या बँकेने त्यांना दिलेल्या मूळ पंजीकरण प्रमाणपत्रासह (सी ओ आर), ह्यांचे एनबीएफसी  एमएफआय म्हणून वर्गीकरणात बदल करण्यासाठी, सोबत जोडलेल्या नमुन्याच्या (जोडपत्र  १) परिच्छेद २(१)(अ) मध्ये दिल्यानुसार त्यांचे पंजीकृत कार्यालय ज्याच्या अधिकार क्षेत्राखाली येते त्या प्रादेशिक कार्यालयाकडे पंजीकरण करण्यासाठी ताबडतोब अर्ज करावा. वर्गीकरणामधील एनबीएफसी  एमएफआय असा बदल त्यांच्या सीओआरमध्ये केला जाईल.  एनबीएफसी एमएफआय म्हणून पंजीकरण करण्यास ऑन लाईन अर्ज करणा-या नवीन कंपन्यांनी, हार्ड कॉपीमध्ये, जोडपत्र  २ मध्ये दिल्यानुसार अतिरिक्त माहिती देणे आवश्यक आहे.

---

[१६] डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३००/०३.१०.०३८/२०१२-१३ दि. ऑगस्ट ०३, २०१२ अन्वये स्थापित

## जोडपत्र १

## ......................रोजी अस्तित्वात असलेल्या एनबीएफसींनी, एनबीएफसी एमएफआय म्हणून पुनर्वर्गीकरण करण्यासाठी अर्ज करण्यासाठी सादर करावयाची माहिती.

(अ) अर्जाच्या तारखेस असलेला निजनिधी

(ब) मार्च ३१, २०१२ रोजी ठेवला असलेला कॅपिटल ॲडेक्वसी

(क) अर्जाच्या तारखेस असलेली लोन ॲसेट प्रोफाईल.

| वर्ग | | | | खात्यांची संख्या | आऊटस्टँडिंग रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | अर्जाच्या तारखेस आऊटस्टँडिंग असलेली एकूण कर्जे. | | | | |
| | १. | वरील बाब (१) पैकी, रु.१५,००० आणि त्यापेक्षा कमी रकमांची, जानेवारी १, २०१२ रोजी किंवा नंतर मंजुर केलेली कर्जे. | | | |
| | | १. | वरील १ पैकी १ वर्षापेक्षा अधिक मुदतीची कर्जे. | | |
| | २. | (२) वरील बाब (१) वर, रु.१५,०००/- पेक्षा अधिक रकमांची, जानेवारी १, २०१२ रोजी किंवा त्यानंतर मंजुर केलेली कर्जे. | | | |
| | | १. | (१) वरील बाब (२) बाबत २४ महिन्यांपेक्षा कमी मुदतीची कर्जे. | | |
| | ३. | उत्पन्न निर्माण करण्यासाठी दिलेली कर्जे. | | | |
| | ४. | पुढील प्रमाणे घरगुती वार्षिक असलेली कर्जे | | | |
| | | १. | रु.६०,०००/- पेक्षा अधिक (ग्रामीण क्षेत्रांसाठी) | | |
| | | २. | रु.१,२०,०००/- पेक्षा जास्त (अर्धनगरी व नागरी क्षेत्रांसाठी) | | |
| | ५. | जर कर्जदाराने २ पेक्षा अधिक एमएफआयकडून कर्ज घेतले आहे | | | |
| | ६. | जेथे कर्जदार एकापेक्षा अधिक एसएचजी/जेएलजीचा सभासद आहे | | | |
| | ७. | जेथे एसएचजी/जेएलजीचा सभासद म्हणून व त्याशिवाय वैय्यक्तिक क्षमतेतही कर्जे घेतली आहेत. | | | |

**(ड) खर्च/किंमत काढणे**

(अ) मार्च ३१, २०११ व २०१२ रोजी एनबीएफसी एमएफआयने घेतलेल्या कर्जांची सरासरी व्याज-खर्च

(ब) मार्च ३१, २०११ व २०१२ रोजी एनबीएफसी एमएफआयने दिलेल्या अग्रिम राशींवर आकारलेले सरासरी व्याज.

(ई) वरील बाब क्र. (१) मधील, मार्च ३१, २०१२ रोजी आंध्र प्रदेश राज्यात थकित (आऊटस्टँडिंग) असलेल्या कर्जांची संख्या व रक्कम.

(फ) मार्च ३१, २०१२ रोजी आंध्र प्रदेश राज्यातील कर्जां विरुध्द ठेवलेल्या तरतुदींची (असल्यास) रक्कम

(ग) अर्जदार कंपनीशी संबंधित असलेल्या क्रेडिट इन्फर्मेशन ब्युरो/कंपनीचे नाव.

नाव :

सही :

तारीख :

## जोडपत्र २

## एनबीएफसी  एमएफआय म्हणून पंजीकरण प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज करणा-या नव्या कंपन्यांनी सादर करावयाची माहिती

**(अ) अर्जाच्या तारखेस असलेला निज निधी.**

**(ब) पुढील गोष्टी दर्शविणारी, पुढील ३ वर्षांसाठीच्या व्यवसाय योजनेचा प्रक्षेप (वर्षानिहाय)**

(१) निर्माण करावयाच्या लोन ॲसेट्सची रक्कम

(२) उत्पन्न निर्माण करण्यासाठी देऊ करावयाच्या लोन ॲसेट्सची रक्कम

(३) ग्रामीण क्षेत्रात आणि अर्ध नागरी व नागरी क्षेत्रात निर्माण करावयाच्या ॲसेट्सच्या रकमेचा वाबवार तपशील.

(४) ग्रामीण आणि नागरी व अर्धनागरी क्षेत्रात कंपनी आधार देऊ इच्छित असलेल्या कार्यकृती

(५) प्रक्षेपित नफा

(६) घेतलेल्या कर्जांचा सरासरी खर्च/किंमत

(७) ॲसेट्सवरील सरासरी परतावा (आर ओ ए)

(८) पुढील बाबतीत अपेक्षित असलेला भांडवली खर्च

(अ) जमीन व इमारती

(ब) आयटी स्त्रोत

(९) कंपनी कार्य करु इच्छित असलेली ठिकाणे

(१०) एसएचजी/जेएलजींच्या कैाशल्य वर्धापनासाठी व प्रशिक्षणासाठी ठेवलेले स्त्रोत.

नाव :

सही :

दिनांक :

**जोडपत्र ३**

**एपी पोर्ट फोलियोवर तरतुदी केल्यानंतरचा सीआरएआर काढणे.**

| केलेल्या एपी पोर्टफोलियोमध्ये परत मिळविलेल्या व हळुहळु कमी केलेल्या तरतुदी. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **वर्ष** | **तरतुदींमुळे झालेला तोटा** | **भांडवल** | **परत मिळविलेल्या तरतुदी** | **नक्त भांडवल (३ + ४)** | **लागणारे भांडवल (@ १५%)** | **आवश्यक भांडवल भरणा** | **नॉन एपी** | **एपी.** |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| सुरुवातीची स्थिती | **०** | | | | **३०** | | **१००** | **१००** |
| २०१२-१३ | -१०० | -७० | १०० | ३० | ३० | ० | १०० | १०० |
| २०१३-१४ | | -७० | ८० | १० | २७ | १७ | १०० | ८० |
| २०१४-१५ | | -५३ | ६० | ७ | २४ | १७ | १०० | ६० |
| २०१५-१६ | | -३६ | ४० | ४ | २१ | १७ | १०० | ४० |
| २०१६-१७ | | -१९ | २० | १ | १८ | १७ | १०० | २० |
| २०१७-१८ | | -२ | ० | -२ | १५ | १७ | १०० | ० |
| २०१८-१९ | | १५ | ० | १५ | १५ | ० | १०० | ० |
| | | | | | एकुण | ८५ | | |

सुलभीकरणासाठी वरील उदाहरण खाली दिलेल्या गृहीतकांवर आधारित आहे

(अ) एपी पोर्ट फोलियो हा, एनबीएफसी एमएफआयच्या एकूण पोर्ट फोलियोच्या ५०% आहे.

(ब) संपूर्ण एपी पोर्ट फोलियो हा एक तोट्याचा ॲसेट म्हणून धरण्यात आला आहे.

(क) हे पोर्ट फोलियो पुढील पाच वर्षांसाठी स्थिर राहिलेले आहेत.

**जोडपत्र**

| अनुक्रमांक | परिपत्रक क्र. | तारीख. |
|---|---|---|
| १ | डी एन बी एस.पीडी./ सीसी क्र. २६३/०३.१०.०३८ /२०११-१२ २० मार्च, २०१२ | २० मार्च, २०१२ |
| २ | डी एन बी एस सीसी .पीडी. क्र. २६६ | २६ मार्च, २०१२ |
| ३ | डी एन बी एस.(पीडी.) सीसी क्र. ३०० /०३.१०.०३८/२०१२-१३ | ०३ ऑगस्ट, २०१२ |
| ४ | डी एन बी एस.(पीडी.) सीसी क्र. ३२७/०३.१०.०३८/२०१२-१३ | ३१ मे, २०१३ |